# भारतामधील G-20 परिषदेचे फलित

**वेदिका अशोक मोटे** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

G-20 ही जगातील 20 मोठया अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांची संघटना आहे. या गटाची स्थापना १९९७-९८ मध्ये वैश्विक आर्थिक मंदीनंतर १९९९ ला झाली. G-20 गटाचा उद्देश 'जागतिक आर्थिक सहकार्य व स्थैर्य' हा आहे. तसेच या गटाचा मुख्य आधार उत्तर-दक्षिण सहयोग आहे. सुरुवातीला या गटाच्या माध्यमातून सदस्य राष्ट्राचे वित्तमंत्री व केंद्रीय बँकेचे गव्हर्नर जनरल एकत्र येवून चर्चा करत पण २००७ मध्ये पुन्हा आर्थिक मंदीची समस्या निर्माण झाल्यामुळे २००८ पासून सदस्य राष्ट्राचे राष्ट्रपती, अध्यक्ष व पंतप्रधानमंत्री एकत्र येवू लागले.

**स्थापना -१९९९**

**मुख्यालय – या गटाचे कोणतेही मुख्यालय नाही**

**सदस्य १९ + युरोपियन (EU)**

अर्जेटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, मेक्सिको, द. कोरिया, रशिया, सौदी अरेबिया, द. आफ्रिका, तुर्की, ब्रिटन, अमेरिका आणि युरोपियन महासंघ या गटाचे सदस्य होण्यासाठी कोणतेही नियमावली नाही तसेच रचनेमध्ये आतापर्यंत कोणताही बदल झालेला नाही. ही संघटना विकसित व विकसनशील देशाची आहे.

**अतिथी देश :**

शिखर बैठकीला सदस्य राष्ट्र सहभागी होतात तसेच इतर देशांना, वेगवेगळ्या क्षेत्रीय संघटना व आंतरराष्ट्रीय संघटनाना निमंत्रित केले जाते.

अतिथी देशामध्ये बांगलादेश, इजिप्त, मॉरिशस, नेदरलँड्स, नायजेरिया, ओमान, सिंगापूर, स्पेन, संयुक्त अरब अमिरात यांचा समावेश होतो.

२००८ मध्ये G-20 पहिली शिखर बैठक वॉशिंग्टन (अमेरिका) येथे झाली. ही बैठक सदस्य देशाच्या प्रमुखाच्या स्तरावर झाली. त्यानंतर दुसरी बैठक २००९ मध्ये २ वेळा लंडन आणि सेंट पिट्सबर्ग (USA) येथे झाली या बैठकीमध्ये 'आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठी प्रमुख मंच' म्हणून नियुक्त करण्यात आले आत्तापर्यंत एकूण १७ बैठका G-20 च्या झाल्या आहेत.

G-20 ची शिखर परिषद दरवर्षी फिरते अध्यक्षांच्या (रोटेशन प्रेसिडेंसी) नेतृत्वाखाली आयोजित केली जाते. G-20 ने सुरुवातीला मोठया प्रमाणात व्यापक आर्थिक मुद्यावर लक्ष केंद्रित केले परंतु त्यानंतर व्यापार, शाश्वत विकास, आरोग्य, कृषी, ऊर्जा, पर्यावरण, हवामान बदल आणि भ्रष्टाचारविरोधी यांचा समावेश असलेल्या इतर गोष्टींसह आपला अजिंडा विस्तारला आहे. अध्यक्षपद हे इतर सदस्यांशी सल्लामसलत करून आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील घडामोडींना प्रतिसाद म्हणून G-20 अजेंडा जबाबदार आहे. G-20 सदस्य जागतिक GDP पैकी ८५% जागतिक व्यापारापैकी ७५% पेक्षा जास्त आणि जगाच्या लोकसंखेपैकी दोन तृतीयांश प्रतिनिधित्व करतात.

G-20 चे मुख्यालय नसल्यामुळे या गटाची शिखर परिषदेचे आयोजन ट्रोइकामार्फत केले जाते. यानुसार पूर्वीचे, वर्तमान आणि भविष्य अध्यक्ष मिळून वर्तमान परिषदेचे आयोजन केले जाते. G-20 अध्यक्षपद एका वर्षासाठी G-20 अजेंडा चलविते आणि शिखर परिषदेचे आयोजन करते.

G-20 दोन समांतर ट्रॅक मध्ये काम करते.

1. वित्तीय ट्रॅक
2. शेर्पा ट्रॅक

वित्तीय ट्रॅक वित्तीय मंत्रालयाच्या नेतृत्वाखाली वित्तमंत्री व केंद्रीय बँकेचे गव्हर्नर कार्य करतात तर शेर्पा ट्रकचे प्रत्येक देशाचा शेर्पा नेतृत्व करतो. जे नेत्यांचे वैयक्तिक दूत असतात. दोन्ही ट्रॅक मध्ये विषयानुसार कार्य गट आहेत ज्यात सदस्यांच्या सबंधित मंत्रालयाचे प्रतिनिधी, आमंत्रित देश आणि विविध आंतरराष्ट्रीय संस्थाचे प्रतिनिधी सहभागी होतात हे कार्यकारी गट प्रत्येक अध्यक्षपदाच्या संपूर्ण कार्यकाळात नियमितपणे चर्चेस उपस्थित राहतात. शेर्पा वर्षभराच्या बैठकीचे आणि G-20 च्या महत्त्वपूर्ण कार्यात समन्वय साधतात.

G-20 गटामध्ये सदस्य देशातील नागरी समाज, संसद सदस्य, विचारमंच, महिला, तरुण, कामगार व्यवसाय आणि संशोधक यांना एकत्र आणण्यासाठी संलग्न गट आहेत.

**उद्देश :**


९ व १० सप्टेबर २०२३ रोजी भारतामध्ये आलेल्या G-20 शिखर परिषदेच्या परिणामांचा अभ्यास करणे.

भारतामध्ये १८ वी G-20 शिखर परिषद ९ -१० सप्टेबर २०२३ दरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम आंतरराष्ट्रीय प्रदर्शन परिषद केंद्र (IECC) येथे यशस्वीरीत्या पार पडली. या शिखर परिषदेचे अध्यक्षपद हे भारताकडे होते. G-20 शिखर परिषदेचे

*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIII / Issue – I* *ISSN 2277-8063*

आयोजन ट्रोइकामार्फत होत असल्याने भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात ट्रोईकामध्ये इंडोनेशिया, भारत आणि ब्राझील यांचा समावेश होता.




भारताकडे G-20 चे अध्यक्षपद १ डिसेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत १ वर्षासाठी होते.

G-20 सदस्य देशाचे प्रमुख शिखर बैठकीसाठी दिल्लीत उपस्थित होते अपवाद चीन आणि रशिया या देशांचे प्रामुख्याने पंतप्रधान आणि विदेश मंत्री परिषदेसाठी आले होते.

**भारतातील G-20 परिषद :**

**संकल्पना–**

**"वसुधैव कुटुंबकम्"** म्हणजे "एक पृथ्वी, एक कुटुंब एक भविष्य" (One Earth, One Family One Future)

**चिन्ह (Logo):**

G-20 परिषदेने आपल्या परिषदेच्या लोगोसाठी भारताच्या राष्ट्रीय ध्वजाच्या रंगापासून भगवा, पांढरा आणि हिरवा आणि निळा प्रेरणा घेतली. भारताचे राष्ट्रीय फुल कमळाला पृथ्वी या ग्रहाला जोडले जे कठीण परिस्थितीमध्येही विकास, प्रगती होते याची प्रेरणा देते.

लोगो आणि संकल्पना मार्फत भारताने G-20 परिषदेच्या माध्यमातून जगाला अशांत काळात, शाश्वत सर्वांगीण, जबाबदार आणि सर्वसमावेशक रीतीने न्याय आणि न्यायाच्या वाढीसाठी प्रयत्नशील होता आणि आहे असा संदेश दिला.

**भारत G-20 सचिवालय :**

परराष्ट्र मंत्रालय (सुषमा स्वराज भवन, नवी दिल्ली) भारताच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात देशभरातील G-20 बैठकांचे संचालन आणि समन्वय यासाठी कार्यरत होते. भारतात G-20 चे वर्षभरात वेगवेगळ्या ठिकाणी २०० बैठका झाल्या आहेत.

**भारताचे शेर्पा – अमिताभ कांत**

**निमंत्रित देश व संघटना**

बांग्लादेश, इजिप्त, मॉरिशस, संयुक्त अरब अमिराती, स्पेन, सिंगापूर, ओमान, नायजोरिया, नेदरलँण्ड

**सहभागी प्रमुख संघटना**

संयुक्त राष्ट्र, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आर्थिक सहकार्य आणि विकास संघटना, जागतिक आरोग्य संघटना, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, इंटरनॅशनल सोलर अलायन्स, आर्थिक स्थिरता मंडळ इत्यादी संघटना, आफ्रिकन युनियन, आफ्रिकन युनियन डेव्हलपमेंट एजेन्सी (AUDA-NEPAD) व आसियान या प्रादेशिक संघटनेचे अध्यक्ष उपस्थित होते.

**चर्चेचे विषय**

जागतिक अर्थव्यवस्था, कर्ज पुनर्रचना, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्रिप्टोकरन्सी, रशिया-युक्रेन युद्ध आणि इतर आंतरराष्ट्रीय समस्या.

**या परिषदेची वैशिष्ट्ये**

१) G 20 परिषद प्रथमच भारतात होत आहे.

२) मुख्य परिषदेपूर्वी वर्षभरात विविध मुद्यांवर २०० बैठका.

३) अध्यक्षपदाच्या माध्यमातून सर्व सदस्य देशांमधील सहकार्य वाढविण्यावर भारताचा भर.

**नवी दिल्ली घोषणा पत्रातील मुद्दे**

नवी दिल्लीतील घोषणापत्र म्हणजे सर्वव्यापी एकमत असून निर्णायक एकमत नाही. या घोषणापत्रात १० प्रमुख मुद्दे आणि ३७ उपमुद्दे होते. या सर्व मुद्यांवर सर्व सदस्य राष्ट्रांनी सहमती दर्शविली होती.

२०२२ मध्ये इंडोनेशिया येथील बालीमध्ये झालेल्या G 20 परिषदेतील घोषणा पत्रात रशियाचा कठोर शब्दात निषेध करण्यात आला होता. तसेच युक्रेन युद्धाबाबत मत व्यक्त करायचे म्हणून केले होते. याउलट दिल्ली घोषणा पत्रात परिस्थितीला सामोरे जात सध्याच्या समस्याबाबत चर्चा करण्यात आली. या घोषणा पत्रात युक्रेन युद्धात झालेल्या मानवी हानीबद्दल आणि युद्धामुळे जगावर होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. भारताने सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्याने हे घोषणापत्र सर्वमान्य झाले असे तज्ञाचे मत आहे.

१) सर्व देश शाश्वत विकासाच्या उद्दिष्टावर काम करतील.
२) भारताच्या मार्गदर्शनाखाली 'One Future' गट स्थापन करणार.
३) जैव इंधन आघाडीची स्थापना, संस्थापक सदस्य भारत, अमेरिका आणि ब्राझीलला स्थान.
४) 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' यावर भर देणार.
५) बहुस्तरीय विकास बँकाना बळकटी देणार, या बँकाचा विस्तार करणार.
६) 'ग्लोबल साऊथ' च्या मुलभूत गोष्टीवर लक्ष.
७) क्रिप्टोकरन्सी वर जागतिक धोरण ठरविण्यासाठी चर्चा करणार.
८) कर्जासाठी योग्य व्यवस्था करण्यासाठी समान रचना करण्यावर जोर.
९) वेगाने विकसित होणाऱ्या जगभरातील शहरांना निधी पुरविणार.
१०) हरित व कमी कर्ब तंत्रज्ञानावर संशोधन.

**भारतातील G 20 परिषदेचे परिणाम**

**१)** रशिया-युक्रेन युद्ध सुरु झाल्यानंतर रशियाचा सहभाग असलेल्या बहुतेक सर्व जागतिक परिषदामध्ये संयुक्त निवेदनावर एकमत झाले नव्हते मात्र भारतातील G20 परिषदेमध्ये रशियाचा सहभाग असूनही घोषणापत्र सर्वसहमतीने मान्य करण्यात आले हे भारताचे यश मानले पाहिजे.

**२)** G20 देशांनी आफ्रिकन युनियनला G20 मध्ये स्थायी सदस्य म्हणून मान्यता दिली. १९९९ मध्ये G20 च्या स्थापनेनंतरचा पहिला संघ सामील झाला. आफ्रिकन युनियनमध्ये एकूण 55 देशांचा समावेश होतो. याचे अध्यक्ष अजाली असोमानी (राष्ट्रपती, कोमोरोस) G20 ही आता G21 म्हणून ओळखली जाईल.

**३)** शाश्वत जैव इंधनाचा विकास आणि अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि सबंधित मानके आणि प्रमाणीकरण करण्यासाठी Global Biotual Alliance (GBA) नावाची नवीन संस्था सुरु करण्यात आली. या उप्रकमाचा उद्देश जैवइंधनाला ऊर्जा संक्रमणाचा प्रमुख घटक म्हणून स्थान देणे आणि रोजगार निर्मिती आणि आर्थिक वाढीस हातभार लावणे आहे.

**४)** हवामान बदलाच्या संदर्भात घोषणेने २०५० पर्यत निव्वळ शून्य उत्सर्जन गाठण्यासाठी २०३० पूर्वीच्या काळात US$ ५.८ -५.९ ट्रिलियन विकसनशील देशांसाठी आणि २०३० पर्यंत स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानासाठी US $4 ट्रिलियन एकत्रित करण्याच्या निडकीवर जोर दिला. त्यात हवामान निधीमध्ये भरीव वाढ, अब्जावधी ते ट्रिलियन डॉलर्समध्ये बदलण्याची मागणी करण्यात आली.

**५)** G20 देशाच्या गटाने भारत मध्य-पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (IMEC) या नावाने भारताला मध्यपूर्व आणि युरोपशी जोडणारा रेल्वेमार्ग, बंदरे तयार करण्यासाठी संयुक्त करार केला. या गटात भारत, अमेरिका, सौदी अरेबिया, युरोपियन युनियन, युएई, फ्रान्स,जर्मनी आणि इटली या सरकारमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. हा प्रकल्प भागीदारी फॉर ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट (PG11) च्या नियंत्रणाखाली येतो.

**६)** G20 नवी दिल्ली नेत्यांच्या घोषणेमध्ये पर्यावरणासाठी मुख्य प्रवाहातील जीवनशैली (Life) शाश्वर ऊर्जा संक्रमणे लागू करणे, शाश्वत वित्तपुरवठा करणे, शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) चा पाठपुरावा करणे, प्लॅस्टिक प्रदुषणावर उपाय करणे, महासागरावर आधारित अर्थव्यवस्था जतन करणे या वचन बद्धतेच समावेश आहे.

**७)** G20 परिषदेसाठी देशात आलेल्या १५ राष्ट्रप्रमुखाशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेमध्ये प्रामुख्याने आर्थिक विकास, भारत व संबंधित देशांशी सांस्कृतिक संबंध वृंद्धिगत करणे व दोन्ही देशामधील व्यापार वाढविण्यावर भर देणे या मुद्याचा समावेश होता.

**८)** G-20 देशांनी २०३० पर्यत जागतिक अक्षय ऊर्जा क्षमता तिप्पट करण्याच्या दिशेने काम करण्याचे आश्वासन दिले.

**९)** हरित पर्यावरणासाठी निधी अपुरा पडत असल्यामुळे ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी २ अब्ज डॉलरची मदत करण्याची घोषणा केली.

**१०)** G-20 शिखर परिषदेचे अध्यक्षपद भूषवण्याऱ्या मोदींनी युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल (UNSC) सारख्या जागतिक संस्थामध्ये बदलत्या जागतिक गतिमानतेशी जुळवून घेण्याचा सल्ला दिला. ज्याला अमेरिकेकडून पाठिंबा मिळाला.

**११)** ग्लोबल वॉर्मिंग १.५ अंश सेल्सिअस (२.७ अंश फॅरेनहाइट) पर्यत मर्यादित ठेवण्यासाठी ४३ टक्के ग्रीनहाऊस पुन्हा आवश्यक आहे. हे G20 ने मान्य केले. २०३० पर्यंत जागतिक स्तरावर अक्षय ऊर्जा क्षमता तिप्पट करण्याच्या करार..........

**१२)** चांगल्या मोठ्या आणि प्रभावी बहुपक्षीय विकास बँक (MDBs) निर्माण करण्यासाठी जागतिक बँकेसह भारत, दक्षिण आफ्रिका व अमेरिका प्रयत्नशील असतील.

**समारोप**

G20 संघटना आता G21 म्हणून ओळखली जाईल. भारतातील G20 परिषद ही सर्वसमावेशक व मानव केंद्रित विकासाला महत्त्व देणारी होती. G20 परिषदेचे अध्यक्षपद भारताला प्रथमच मिळाल्यामुळे नेतृत्त्वाची वेगळी संधी देशाला मिळाली होती आणि त्याचा पुरेपुर वापर करून जगासमोर देशाला सादर करण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. भारताकडे जगाचे नेतृत्त्व करण्याची क्षमता आहे हे G20 परिषदेच्या यशस्वी आयोजनातून स्पष्ट होते असे असले तरी जगाचे नेतृत्त्व करण्याची ही

भारताची पहिलीच वेळ नाही या आधीच्याही नेतृत्त्वानी अनेक परिषदा, संघटनांच्या माध्यमातून आपली महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसून येते.

मुळात भारताने G20 परिषद ज्या परिस्थितीत आयोजित केली व ती यशस्वीपणे पार पाडली ती परिस्थिती रशिया-युक्रेन युद्ध संघर्षाची होती. या युद्धामुळे संपूर्ण जग होरपळून जात आहे या आधीच कोरोना महासाथीमुळे मोठमोठ्या अर्थव्यवस्था उलमडून पडल्या आहेत आणि या युद्धामुळे पुरवठा साखळीच विस्कळीत झाल्या आहेत. युद्धातून ना. रशिया माघार घेण्यास तयार आहे ना युक्रेन. या अशा पार्श्वभूमीवर G20 परिषद आयोजित करून परिषदेची घोषणा पत्र सर्व सदस्य राष्ट्राकडून मान्य करून घेणे हे भारतासाठी महत्त्वाचे यश आहे.

भारतातील G20 परिषद ही 'वसुधैव कुटंबकम्' (One Earth, One family, on future) ही संकल्पना आणि 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास व सबका प्रयास' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चतुसूत्रीनुसार संपूर्ण जग हे एक कुटुंब असून कुटुंबाचा विकास हा सर्वाच्या बरोबरीने, सहकार्याने प्रयत्नाने होत असतो' यावर आधारित होती. या उद्दिष्टानुसार आफ्रिकन महासंघाला ज्यामध्ये ५५देशांचा समावेश असून या देशामध्ये अजूनही राजकीय अस्थैर्य, स्थानिक प्रश्न उपासमारी, बेरोजगारी आणि हिंसाचार यासारख्या समस्यामुळे महासंघाला स्थैर्य प्राप्त झाले नाही, विकासाला वाव मिळाला नसल्यामुळे आफ्रिकन महासंघ पाठीमागे पडलेला दिसून येतो. आफ्रिकन महासंघाला विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी G20 मध्ये स्थायी सदस्य म्हणून घोषित केले. G20 मध्ये आफ्रिकन महासंघाच्या समावेशामुळे संवाद आणि सहभागाची कक्षा रूंदावतील, ग्लोबल साऊथचे प्रतिनिधित्व वाढवण्याची महत्त्वाची भूमिका बजावेल तसेच भारताला UNSC (युनायटेड नेशन सेक्युरिटी कौन्सिल) मध्ये कायमस्वरूपी स्थान मिळविण्याच्या महत्त्वकांक्षेला पाठपुरावा करण्यासाठी आफ्रिकन महासंघाचा पाठिंबा मिळू शकतो.

G20 परिषदेत महत्त्वाचा निर्णय घेतला तो म्हणजे भारत मध्यपूर्व युरोप आर्थिक कॉरिडॉर (IMEC) या कॉरिडॉरमुळे भारताला आर्थिक प्रगतीची मोठी संधी आहे. किफायतशीर भावात औद्योगिक उत्पादनाची आणि रेल्वे उभारण्याची संधी मिळाली. IMEC कॉरिडॉर चीनच्या बेल्ट अॅण्ड रोड इनिशिएटिव्ह (BRI) साठी एक पर्याय बनू शकतो. तसेच चीनच्या विस्तारवादी धोरणाला शह बसू शकतो. पर्यावरणीय निर्णयाचा विचार केला असता हवामान बदल, कार्बन उत्सर्जन, बहुजैववैविध्याचा ऱ्हास, जमिनीची धूप, प्रदूषण, दुष्काळ, वाढता ऊर्जाखर्च यासारख्या समस्यावर विचार करण्यात आला. हवामान बदलावर मात करण्यासाठी भारताने जबाबदारी घेत सौरउर्जेत जागतिक सहकार्य, निसर्गाशी नाते सांगत शाश्वत विकास (लाईफ), आपत्ती व्यवस्थापनासाठी सहकार्य वाढीवर भर दिला आहे. Global Biofual Alliance ही नवीन संस्था स्थापन केली. जेणेकरून जैव इंधनाच्या विकासाला प्रोत्साहन मिळेल आणि Global Warming १.५ डिग्री सेल्सिअसपर्यंत कमी करण्यासाठी निश्चित केले.

G20 परिषदेमध्ये भारताने डिजीटल कौशल्य दाखवून दिले आहे. परिषदेसाठी दाखल झालेल्या प्रतिनिधींना भारतमंडपम मध्ये 'डिजिटल इंडिया एक्सपेरियन्स झोन' मध्ये डिजिटल सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या, परिषदेमध्ये भारताने डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून तयार केलेल्या उपायांची दखल जागतिक स्तरावर घेतली गेली आहे. तसेच परिषदेमध्ये जागतिक नेत्यांनी चांद्रयान ३ च्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदीचे अभिनंदन केले, युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेरलेन यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोखमीना तोंड देण्यासाठी नवीन जागतिक फ्रेमवर्क तयार करण्यासाठी AI गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदीनी दहशतवादाच्याही समस्यांबाबतही उल्लेख केला. दहशतवाद्यांचे आर्थिक व्यवहार इंटरनेटद्वारे होत असल्यामुळे सायबर सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिक यंत्रणा आवश्यक आहे असे ठामपणे सांगितले. "आपण ज्यावेळी प्रत्येक देशाच्या सुरक्षा आणि संवेदनाची काळजी घेऊ त्याचवेळी 'एक भविष्य' ही भावना दृढ होईल" असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी G20 परिषदेच्या समारोप भाषणात व्यक्त करून G20 परिषद २०२४ च्या अध्यक्ष पदाची सुत्रे ब्राझीलचे अध्यक्ष लुईज इनासिओ लुला दा सिल्वा यांच्याकडे सुपूर्द केली.

**संदर्भ**

१) मानव केंद्रीत जागतिकीकरण, लेख, नरेंद्र मोदी, सकाळ, ७ सप्टेंबर, २०२३.

२) दैनिक, सकाळ, ९, १० व ११ सप्टेंबर २०२३.

३) आफ्रिकेला संधी बेड्या झुगारण्याची, लेख, निखिल श्रावगे, सकाळ, १५ सप्टेंबर २०२३.

४) सहकार्याची सोनेरी स्वप्ने, संपादकीय लेख, सकाळ, ५ सप्टेंबर, २०२३.

५) भारताच्या जागतिक नेतृत्त्वावर माहेर, लेख सुरेश भुसारी, सकाळ, ११ सप्टेंबर २०२३.

६) वैश्विकतेची राजनिती, संपादकीय लेख, सकाळ, ११ सप्टेंबर २०२३.

७) Key out comes of the 2023 G20 summit held in India, Harshwardhan Sharma, India Briefing, Sept. 11, 2023.

८) https://www.g20in

९) https://en.m.wikipedia.org

१०) www.narendramodi.in